## जाहिरात

१. अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र,सुराबर्डी नागपूर येथील काऊंटर इन्सर्जन्सी अँड अँटी टेरोरिस्ट (CIAT) स्कुल, सुराबर्डी, नागपूर करिता तात्पुरत्या स्वरूपात खालील पदांवर करार पध्दतीने निश्चित वेतनावर आर्मी तसेच केंद्रिय व राज्य सशस्त्र पोलीस दलातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांची प्रशिक्षक म्हणुन नेमणूक करण्याचे थेट मुलाखतीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

| पदाचे विवरण | निश्चित वेतन | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|
| JCO/Insp./SI ची ०१ पद | ३०,०००/- दरमहा | काऊंटर इन्सर्जन्सी अँड अँटी टेरोरिस्ट (CIAT) स्कुल,सुराबर्डी, |
| NCO/ASI/HC ची ०६ पदे | २०,०००/- दरमहा | वडधामना, अमरावती रोड,नागपूर-४४००२३<br>दुरध्वनी क्र. ०७१०४-२४००३३. |

सदरच्या पदांकरिता दयावयाचा अर्जाचा विहीत नमुना सोबत दर्शविलेला आहे. अर्जदार जर स्थानिक रहिवासी असेल तर त्यांनी शक्य असल्यास या कार्यालयात हजर राहून प्रत्यक्ष हजर राहून अथवा पोस्टाद्वारे अथवा ई-मेलद्वारे खालील नमुद पत्त्यावर सदरचा अर्ज दि.०५/१०/२०१७ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावा. (प्रत्यक्ष वा पोस्टाद्वारे अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी अर्जासोबत स्वतःचे संपूर्ण नाव व पत्ता व त्यावर रू.५/- चे पोस्टल स्टॅम्प असलेला मध्यम आकाराचा रिकामा लिफाफा जोडावा) प्रस्तुत प्रकरणी प्राप्त उमेदवारांच्या अर्जामधून छाननी समितीने पात्र ठरविलेल्या उमेदवारांना थेट मुलाखतीकरीता बोलविण्यात येणार आहे. सदरची माहिती www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावरसुध्दा उपलब्ध आहे.

२. अर्ज या पत्त्यावर सादर करावा :- प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, सुराबर्डी, वडधामना, अमरावती रोड, नागपूर-४४००२३ अथवा ईमेल : prin.uotc.nagpur@mahapolice.gov.in

३. मुलाखतीकरीता बोलाविण्यात येणा-या उमेदवारांनी खालील मूळ कागदपत्रे साक्षांकित केलेल्या प्रतीसह व दोन पासपोर्ट फोटोसह मुलाखतीच्या वेळी सोबत आणावे.

१) जन्मतारखेचा पुरावा, २) शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, ३) सेवा नियुक्तीचे व सेवा निवृत्तीचे प्रमाणपत्र, ४) घेतलेल्या प्रशिक्षणाची प्रमाणपत्रे. ५ ) आधार कार्ड व पॅन कार्डची प्रत.

अटी व शर्ती :-

१. प्रशिक्षण संस्थेमध्ये काम केलेल्या उमेदवारांना व (artillery & Infantry )काम केलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल.

२. CIAT स्कुल करिता प्रशिक्षक म्हणुन सैन्य दलातील किंवा सशस्त्र पोलीस दलातील (केंद्रीय तथा राज्य) सेवानिवृत्त अधिकारी किंवा कर्मचारी असणे आवश्यक राहील. तसेच मुलाखतीच्या दिनांकास आवश्यक अर्हता, अनुभव व वय ग्राहय धरण्यात येईल.

३. प्रशिक्षक म्हणून टॅकटीक्स, फिल्ड क्राफ्ट, जंगल वॉरफेअर ट्रेनिंग, मॅप रिडींग, आधुनिक शस्त्रास्त्र हाताळणी, दहशतवाद व नक्षलवाद इत्यादि विषयामध्ये प्रशिक्षण देण्यास सक्षम/पारंगत असावेत व या विषयामध्ये प्रशिक्षक म्हणून काम केलेले असावे. प्रशिक्षक म्हणुन चारित्र्य व सचोटी उत्तम असली पाहिजे व शारिरिक दृष्टया सक्षम असणे अनिवार्य राहिल.

४. महाराष्ट्र शासन, समान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.:संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ नुसार शासनाने ठरऊन दिलेल्या पध्दतीनुसार सुरवातीला निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात एक वर्षाच्या कालावधी करिता प्रशिक्षक म्हणुन नेमणुक करण्यात येईल व तदनंतर आवश्यकतेनुसार कामगिरी बघून वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करण्यात येईल. मात्र नेमणूकीचा एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक राहणार नाही.

५. अधिकारी/कर्मचारी नुसार (नियमाप्रमाणे) उपलब्धतेनुसार शासकीय निवासस्थान पुरविण्यात येईल.

६. सलग सेवेच्या एका वर्षाच्या कालावधीकरीता एकूण ३० रजा देण्यात येईल.

७. सदर नेमणुकीत कायम स्वरूपी करण्याचा कोणताही दावा करता येणार नाही. तसेच प्रशिक्षण कालावधीत किंवा अन्य कारणांकरिता न्यायालयात दाद मागता येणार नाही.

८. अधिकारी व कर्मचारी यांना जवळच्या सैनिक हॉस्पीटल मध्ये ECHS सुविधा पुर्वीप्रमाणेच चालू राहील. तसेच महाराष्ट्र शासनाच्या मान्यताप्राप्त वैद्यकीय हॉस्पीटल मधील सुविधा लागू राहतील.

९. प्रशिक्षक म्हणुन नेमणुक करण्याचा सर्वस्वी निर्णय निवड समितीचा राहील. प्रशिक्षण कालावधीत गैरवर्तणूक आढळून आल्यास प्रशिक्षक पदावरून कमी करण्याचा निर्णय निवड समितीचा राहील.

१०. वरिल अटी व्यतिरिक्त वरिष्ठांकडून अधिक काही अटी कार्यालयास प्राप्त होतील किंवा आवश्यकतेनुसार कमी होतील त्याप्रमाणे लागू राहतील.

११.उमेदवारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

# अर्जाचा विहीत नमुना

प्रति,

विशेष पोलीस महानिरिक्षक,
नक्षल विरोधी अभियान,म.राज्य,नागपूर तथा अध्यक्ष
निवड समिती,CIAT स्कुल,सुराबडी, वडधामना, अमरावती रोड,
नागपूर-४४००२३

Pest recent Passport Size photo duly self attested

विषय :- ------------------------------ पदासाठी अर्ज.

-ooo-

महोदय,

मी उपरोक्त पदासाठी खालील तपशिलासह अर्ज सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | संपुर्ण नाव | :- |
| २ | पुर्ण पत्ता | :- |
| ३ | मोबाईल क्रमांक | :- |
| ४ | ई-मेल | :- |
| ५ | जन्म दिनांक व वय | :- |
| ६ | शैक्षणिक पात्रता | :- |
| ७ | अवगत भाषा | :- |
| ८ | सेवानियुक्तीचा दिनांक | :- |
| ९ | सेवानिवृत्तीचा दिनांक | :- |
| १० | नोकरीचा कालावधी | :- |
| ११ | नेमणुका (रेजीमेंट व बटालियनचे नावासह) | १) |
| | | २) |
| | | ३) |
| | | ४) |
| | | ५) |
| | | ६) |
| | | ७) |
| | | ८) |
| | | ९) |

| | | |
|---|---|---|
| १२ | घेतलेले प्रशिक्षण | १) |
| | | २) |
| | | ३) |
| | | ४) |
| | | ५) |
| | | ६) |
| | | ७) |
| | | ८) |
| | | ९) |
| १३ | प्रशिक्षण केंद्रावरील नियुक्ती, केंद्राचे नाव, विषय व तपशिल | १) |
| | | २) |
| | | ३) |
| | | ४) |
| | | ५) |
| | | ६) |
| | | ७) |
| | | ८) |
| | | ९) |
| १४ | शारिरिक/मानसिक आजाराचा उपचार चालू आहे काय? | :- |

वरिल सर्व तपशिल मी सत्य असल्याचे प्रतिपादन करीत आहे. नसल्यास मी त्यास सर्वस्वी जबाबदार राहील.

उवेदवाराचे सही व पुर्ण नाव

दिनांक :-

ठिकाण :-